स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

CIN of The Corporation
U92100MH1977SGC019882

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.
दुरध्वनी क्र. २८४० १५३३, २८४० १७५५, २८४१ ७५०० फॅक्स : २८४० ०७३४

क्र.दाफाचि-२०२२/कलागारे/म.मा.चि.सवलत/९८७
दिनांक : १२/१२/२०२२ 16/12/2022

## कार्यालयीन आदेश

**विषय : १. मराठी चित्रपट / मालिकांना १ वर्षाच्या कालावधीकरिता देण्यात येणारी ५० टक्के सवलत ही १ वर्षाकरिता न देता कायमस्वरुपी देण्याबाबत.**
**२. मराठी निर्मिती संस्थांना त्यांनी १ वर्षाच्या कालावधीकरिता आरक्षित केलेल्या सेटवर त्यांच्या एकापेक्षा अधिक मराठी मालिकांचे चित्रिकरण केल्यास त्यांना १ महिन्याची सवलत देण्यासाठी पूर्नविचार करण्याबाबत.**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या स्थापनेचा मूळ उद्देश हा निर्मिती संस्थांना महामंडळाच्या परिसरात चित्रिकरणासाठी सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे. विशेषत: मराठी भाषेतील चित्रपट / मालिकांना प्रोत्साहन देणे असल्यामुळे तसेच हिंदी चित्रपट / मालिकांच्या तुलनेत मराठी चित्रपट / मालिका निर्मिती संस्था या व्यवसायिक व आर्थिक दृष्ट्या सक्षम नसल्याने व महामंडळाच्या मूळ उद्देशानुसार मराठी चित्रपट / मालिका निर्मिती संस्थांना प्रोत्साहन व सवलत देणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने मा. व्यवस्थापकीय संचालक यांचे दि.११/१०/२०२२ रोजी निर्मिती संस्थांबरोबर झालेली बैठक व महामंडळाच्या १६० व्या बैठकीमध्ये झालेल्या संचालक मंडळाचा दि.१७.११.२०२२ रोजीचा ठराव क्र.१६०/०९ नुसार, मराठी चित्रपट / मालिकांना खालीलप्रमाणे सवलत लागू करण्यात येत आहे.

१. **i. मराठी चित्रपट / मालिकांना १ वर्षाच्या कालावधीकरिता देण्यात येणारी ५० टक्के सवलत ही १ वर्षाकरिता देण्यात येईल.**

**ii. तद्नंतर केवळ दुसऱ्या वर्षाकरिता सदर चित्रपट / मालिकेकरिता २५ टक्के सवलत देण्यात येईल.**

**iii. दुसऱ्या वर्षानंतर पूर्ण भाडे आकारण्यात येईल. या तीनही बाबींना संचालक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

२. महामंडळाच्या परिसरात दिर्घकालिन कालावधीमध्ये आरक्षित केलेल्या चित्रिकरण स्थळावर ज्या मराठी निर्मिती संस्थांनी सेट उभारला असेल अशा संस्थांना सदर सेटवर त्यांच्या संस्थेच्या दुसऱ्या मराठी मालिकेचे / चित्रपटाचे चित्रिकरण करण्यास, तसेच त्यांनी आरक्षित केलेल्या सदर सेटवर दुसऱ्या मराठी निर्मिती संस्थेला चित्रिकरण करण्यास परवानगी देण्यात येईल. त्या दरम्यान सदर संस्थेला १ वर्षाच्या कालावधीत देण्यात येणारी ३० दिवसाची सवलत जशीच्या तशी लागू राहील. तसेच सदर मराठी निर्मिती संस्था त्यांनी १ वर्षाच्या कालावधीकरिता आरक्षित केलेले चित्रिकरण स्थळ दुसऱ्या मराठी निर्मिती संस्थेला त्यांच्या मराठी मालिकेचे / चित्रपटाचे / ॲड फिल्म्स / वेब सिरीजचे चित्रिकरण करण्यास भाड्याने देऊ शकतील. मात्र सदर मराठी निर्मिती संस्था १ वर्षाच्या कालावधीकरिता आरक्षित केलेले चित्रिकरण स्थळ ३ महिने कालावधीपेक्षा जास्त दिवस भाड्याने देऊ शकणार नाही, असे बंधन राहील. तसेच इतर मराठी संस्थेस चित्रिकरणास दिलेल्या कालावधीसाठी मूळ दराच्या ५० टक्के अधिक दराने भाडे आकारणी करण्यात यावे. याप्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. याबाबतचे प्रणालीमध्ये आवश्यक बदल करण्यात यावेत."

सदर सवलत या आदेशाद्वारे दि.०१.०१.२०२३ पासू लागू करण्यात येत आहे.

व्यवस्थापक (कलागार)

16/12/2022